# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.03.2025** **वार-शनिवार**

---

<u>मदि</u>

भारत तिसरी आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेनं अग्रेसर असताना महिला कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असण्याच्या गरजेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भर दिला आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नारी शक्ती से विकसित भारत या संकल्पनेवर नवी दिल्लीत आयोजित परिषदेत त्या आज बोलत होत्या. विकसित भारताचा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यामध्ये देशातील महिला महत्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

पुणे आणि परिसरात आज आंतरराष्ट्रीय महिला दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

स्त्री जन्माचं स्वागत होणं ही फलश्रुती असल्याचं मत खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी डॉक्टर सुधा कांकरिया लिखित 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या पुस्तकाच्या पंचविसाव्या आवृत्तीचं आज पुण्यात प्रकाशन करताना व्यक्त केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी गेल्या 40 वर्षांपासून डॉक्टर कांकरिया कार्यरत आहेत.

**<u>मदि</u>**

जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं आज दिवसभर प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. ह.भ.प नेहाताई भोसले साळेकर यांच्या किर्तनानं कार्यक्रमांची सुरूवात झाली. त्यानंतर महिला दिनानिमित्त महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला. दुपारी दोन वाजलेपासून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<u>माहेश्वरी</u>**

पुण्यातील माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित महेश विद्यालयामधील विद्यार्थ्यांनी महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर महिला सुरक्षितता आणि महिलांचं आरोग्य याबाबत प्रबोधन आणि जनजागृती करण्यासाठी जेधे चौकात एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी नारी तू नारायणी या पथनाट्याचं सादरीकरण करण्यात आलं. स्त्रियांच्या कर्तृत्वाची महती सांगणारे पोवाडेही सादर करण्यात आले.

**<u>यशस्वी</u>**

राज्याचा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि पुण्यातील यशस्वी एकेडमी फॉर स्किल्सद्वारे मुलींसाठी रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात विविध औद्योगिक कंपन्यांमधील रोजगार संधींसाठी प्राथमिक निवड झालेल्या मुलींना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली.

**<u>फेरी</u>**

पुणे पोलीस दलातील महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वानवडी भागात दुचाकी फेरी काढली. या फेरीत २३२ महिला अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाल्या. बेटी बचाओ बेटी पढाओ असा संदेश या फेरीतून देण्यात आला.

**<u>जीबीएस</u>**

गुइलेन बॅरे सिंड्रोम म्हणजे जीबीएस या आजाराचे रुग्ण वाढल्यानंतर पुणे महापालिकेनं शहराच्या सर्वच भागातील पाणी पिण्यास किती योग्य आहे, याची तपासणी सुरू केली आहे. विशेषतः सिंहगड रस्ता परिसरातील पाण्याचे नमुने सातत्यानं तपासण्यात येत आहेत. आतापर्यंत ७ हजार १९५ नमुने तपासले असून, त्यातील १३८ पाणी नमुने पिण्यास अयोग्य असल्याची बाब समोर आली आहे. दूषित पाण्यात ई-कोलाय आणि कॉलिफॉर्म हे जिवाणू आढळून येत आहेत. पाणी दूषित आढळलेल्या भागात शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची सूचना पाणीपुरवठा विभागाला देण्यात येत आहे. तसंच नागरिकांनी पाणी उकळून प्यावं, असं आवाहन महापालिका आरोग्यप्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी केलं.

**<u>वसतीगृह</u>**

समाजकल्याण विभागाची पुणे जिल्ह्यातील तसंच राज्यातील शासकीय वसतिगृहं आणि निवासी शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी वीज उपलब्ध करून देण्यासाठी सौर यंत्रणा बसविण्यात येणार आहे. वसतिगृहं आणि शासकीय निवासी शाळांमध्ये कायमस्वरूपी वीज उपलब्ध करून देण्यासाठी सौर यंत्रणा आणि सोलर हायमास्ट दिवे बसविण्यासाठी २३ कोटी रूपयांचा खर्च करण्यात येणार आहे असं समाजकल्याण विभागाचे सचिव प्र. वि देशमुख यांनी सांगितलं.

**<u>शिरोळे</u>**

सरकारी रुग्णालयात अति विशेषोपचार तज्ञ डॉक्टरांची पदं निर्माण करावी, तसंच त्यांची भरती बाह्यसंस्थेच्या मार्फतही करण्याचा विचार करून त्याबाबत धोरण ठरवावं, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत गुरुवारी अंदाजपत्रकावरील पुरवणी मागण्यांवरील चर्चेत बोलताना केली.
सरकारी रुग्णालयं, ग्रामीण रुग्णालयं, जिल्हा रुग्णालयं सुसज्ज पद्धतीने उभी केली जातात. तपासण्या, प्रयोगशाळा यासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री बसविली जाते. मात्र, त्याच पद्धतीनं ही रुग्णालयं

चालविण्यासाठी अति विशेषोपचार तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता आहे. तरच उत्कृष्ट दर्जाची सार्वजनिक आरोग्य सेवा महानगरांपासून ग्रामीण भागापर्यंत पुरविली जाईल, असं आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी चर्चेत बोलताना सांगितलं.

**वाहनमुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आज आणि उद्या सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत पिंपरी बाजार परिसरात पहिला वाहन-मुक्त दिवस साजरा करण्यात येत आहे. वाहन-मुक्त दिनानिमित्त संपूर्ण पिंपरी बाजार क्षेत्र सुशोभित केला आहे. या वाहनमुक्त दिवसाचा मुख्य उद्देश नागरिकांना मोकळ्या रस्त्यांचा आनंद घेण्याची संधी देण्याचा आहे. या उपक्रमाद्वारे नागरिक, विक्रेते, व्यवसायिक यांच्या प्रतिक्रिया, सर्वेक्षण आणि चर्चांद्वारे भविष्यातील आराखडा तयार केला जाणार आहे.

**हॉकी**

नेहरूनगर इथल्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर हॉकी महाराष्ट्रच्या पुढाकारानं सुरु असलेल्या अस्मिता हॉकी राज्य लीगच्या उप-कनिष्ठ गट सामन्यांमध्ये मुलींच्या गटात यजमान पुणे संघानं उद्घाटनाचा दिवस गाजवत ठाण्याचा १-० असा पराभव केला. मुंबई उपनगरनं नाशिकवर तर नागपूरनं सांगलीचा पराभव केला.

पुणे आणि परिसरात दिवसा उन्हाचे चटके चांगलेच बसू लागले आहेत. सकाळी गारवा असला तरी दिवसा कमाल तापमान 37 अंशांच्या आसपास असतं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**